तरुण भारत

सातारा

www.tarunbharat.com

बुधवार दि. ९ जानेवारी २०१९

बेळगाव • गोवा •

BHOSALE COLLEGE Library

युवा महोत्सवाच्या तालावर तरुणाई थिरकली

विविध कार्यक्रम पाहण्यासाठी रसिकांची अलोट गर्दी

वार्ताहर
पुसेगांव

प.पू.श्री सेवागिरी महाराजांच्या ७१ व्या पुण्यस्मरणानिमित्त पुसेगाव यात्रेत देवस्थान ट्रस्टने आयोजित केलेल्या जिल्हा युवा महोत्सवात दहिवडी कॉलेज दहिवडीच्या कलाकारांनी लोकनृत्यात व समुहगीतांनी लोकांचे चांगल्या प्रकारे मनोरंजन केले. यामध्ये पुसेगावच्या कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या तर विलास झोलेपाटील युवामंच, येळगावच्या कलाकारांनी पथनाट्यात प्रथम क्रमांक पटकावला. दुरदर्शन व केबलच्या वाढत्या प्रभावातही या युवा महोत्सवातील कार्यक्रम पाहण्यासाठी रसिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.

समुहगीत-कला व वाणिज्य महाविद्यालय पुसेगाव (प्रथम), डी. पी. भोसले कॉलेज कोरेगाव, (द्वितीय) तर मुधोजी महाविद्यालय फलटणने (तिसरा क्रमांक) तर युवा कलामंच येणपे व श्री हनुमानगिरी ज्यु. कॉलेज पुसेगाव संघाने उत्तेजनार्थ क्रमांक मिळवला. पथनाट्य-विलास झोलेपाटील युवामंच, येळगाव (प्रथम), अरविंद गवळी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग (द्वितीय) तर डी. पी. भोसले कॉलेज कोरेगावने

पुसेगाव : सेवागिरी यात्रेतील जिल्हा युवा महोत्सवात महाविद्यालयाचे युवा-युवती कला सादर करताना. (छाया : केशव जाधव)

(तिसरा क्रमांक), प्रबोधन एक सुखवात ग्रुप सातारा संघाने उत्तेजनार्थ क्रमांक मिळावला. रेक्रॉई डान्स-डी.पी.भोसले कॉलेज (प्रथम), डी.पी.भोसले ज्युनिअर कॉलेज कोरेगाव (द्वितीय) तर हिंदवी ग्रुप याने तृतीय क्रमांक मिळवला. युवा महोत्सवाचे संयोजन समितीचे सचिव प्रा.संजय क्षीरसागर यांनी तर सूत्रसंचालन मोहन गुरव यांनी केले.

परांडा येथील श्वान शर्यतीत तांबडा-पांढरा नर 'मास' चॅम्पियन

राज्यस्तरीय श्वान शर्यतीत परांडाच्या पै. माऊली गोडगे यांच्या 'मास' या तांबड्या पांढऱ्या रंगाच्या नर श्वानाने प्रथम क्रमांक मिळवला. सातारा दहिवडी रस्त्यालगत झालेल्या यास्पर्धेत सातारा सोलापूर, सांगली या भागातील श्वानांनी सहभाग घेतला. अत्यंत अटातट्टीच्या लढती असल्याने फायनल दुसऱ्या दिवशी मंगळवारी घेण्यात आली. या स्पर्धा यशस्वी होण्यासाठी संदीप जाधव, विकास जाधव, सचिन जाधव, राजेंद्र जाधव यांनी विशेष परिश्रम घेतले. या स्पर्धेत दुसरा क्रमांक रुबी (काळा) मालक-प्रदीप मंडले, आटपाडीकर. तिसरा राजमुद्रा (वाघा) मालक-सेवागिरी प्रसन्न पुसेगावकर. चौथा वोन्टेड (काळा) मालक-संतोष मस्कर चितळीकर. पाच सेंच्युरी (काळा) मालक-आनंदा शिंदे आसुर्लेकर. सहा लक्ष्मी (राखाडी) मालक-तानाजी वलेकर उंबरमळेकर. सात व्हाईट घडक (पांढरा) मालक-सुमित वलेकर उंबरमळेकर. आठ दुर्गा (काळा) मालक-आकाश जाधव पुसेगावकर. सर्व विजेत्या श्वान मालकांना सेवागिरी देवस्थान ट्रस्टच्यावतीने बक्षीस देऊन गौरविण्यात आले. सूत्रसंचालन प्रकाशबुवा महागावकर यांनी केले.